॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Phone : (02462) 229525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 229572** **E-mail: dsdsrtmun@gmail.com**

जा.क्र./वि.वि.वि/प्रो.अ.गु./२०१९–२०/६८४ दि. १५/०६/२०२०.

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, पेठ, लातूर.

मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.

मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत येणा—या सांस्कृतिक उपक्रमामध्ये पारितोषिक प्राप्त पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्यासंदर्भात.

संदर्भ : शैक्षणिक–१/अतिरिक्त गुण/२०१९–२०/१९४३ दिनांक १८/११/२०१९. नुसार

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सोबतच्या परिपत्रकानुसार विद्यापीठीय पातळीवर युवक महोत्सव, आंतर विद्यापीठ (इंद्रधनुष्य),पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सवामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय, येणा—या विद्यार्थ्यास तसेच आखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव व आंतरराष्ट्रीय दक्षिण आशियाई युवक महोत्सवामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय, व चतुर्थ पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यास प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. तरी आपल्या महाविद्यालयातील/संकुलातील पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या पारितोषिक प्राप्त प्रमाणपत्राची छायांकित प्रत, परिक्षा आसन क्रमांक इ. माहिती सोबत दिलेल्या प्रपत्रात शाखा निहाय भरून प्रस्ताव संचालक, विद्यार्थी विकास विभाग, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड यांच्याकडे दिनांक ०५ जुलै, २०२० पूर्वी पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

डॉ. ज्ञानोबा मुंढे
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

माहितीस्तव प्रत:

१) मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

२) मा. प्र–कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

३) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.

।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION**

**Phone: (02462) 229542**
**Fax : (02462) 229574**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: bos.srtmun@gmail.com**

विद्यार्थी विकास विभाग **(Students Welfare)**, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग **(Sports & Physical Education)**, राष्ट्रीय सेवा योजना **(N.S.S.)**, राष्ट्रीय छात्र सेना **(N.C.C.)** व आविष्कार **(Avishkar)** या अंतर्गत येणाऱ्या उपक्रमांमध्ये पारितोषिक प्राप्त पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्याबाबतची नियमावली शैक्षणिक वर्ष २०१९—२० पासून लागू करण्याबाबत.

# प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, **दिनांक ३० एप्रिल २०१९** रोजी संपन्न झालेल्या **मा. विद्या परिषदेच्या ४४व्या बैठकीतील विषय क्र.२—४४/२०१९** च्या ठरावानुसार **विद्यार्थी विकास विभाग (Students Welfare), क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग (Sports & Physical Education), राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.), राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) व आविष्कार (Avishkar) या अंतर्गत येणाऱ्या उपक्रमांमध्ये पारितोषिक प्राप्त पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्याबाबतची नियमावली** शैक्षणिक वर्ष २०१९—२० पासून लागू करण्यात येत आहे.

सदरील परिपत्रक व नियमावली प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड — ४३१ ६०६.
**जा.क्र.:** शैक्षणिक—१/अतिरिक्त गुण/२०१९—२०/**१९४३**

**दिनांक** : १८.११.२०१९.

स्वाक्षरित/—
**उपकुलसचिव**
शैक्षणिक (१—अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. संचालक, क्रीडा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रस्तुत विद्यापीठ.
६) मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
७) मा. संचालक, सर्व संकुले, विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.
८) मा. संचालक, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, उप—केंद्र, औसा रोड, पेठ, लातूर — ४१३ ५३१.
९) मा. संचालक, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, उप—केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परिसर, परभणी—४३१ ४०२.
१०) मा. प्राचार्य, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड द्वारा संचलित न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली — ४३१ ५१३.
११) प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
१२) उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
१३) साहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
१४) सीनिअर प्रोग्रामर, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

विष्णूपुरी, नांदेड ४३१ ६०६

**विद्यार्थी विकास विभाग (Students Welfare), क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग (Sports & Physical Education), राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.), राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) व आविष्कार (Avishakar) या अंतर्गत येणाऱ्या उपक्रमांमध्ये पारितोषिक प्राप्त पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्या बाबतची नियमावली.**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व विद्यार्थी समाजाभिमुख होण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठ व माननीय राज्यपालांच्या कार्यालयामार्फत अनेक उपक्रम राबविले जातात. या अभ्यासक्रमेतर उपक्रमांतील विद्यार्थ्यांचा सहभाग व गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच संबंधित पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी अतिरिक्त गुण देणे आवश्यक आहे. म्हणून समितीने आपल्या प्रस्तुत विद्यापीठातील प्रचलित पद्धत, महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांतील प्रचलित पद्धती व महाराष्ट्र शासनाची परिपत्रके यांचा अभ्यास करून खालीलप्रमाणे नियमावली तयार केलेली आहे.

उपरोक्त अभ्यासक्रमेतर उपक्रमांमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्याची नियमावली व कार्यद्धती खालीलप्रमाणे असेल.

सदरील नियमावली शैक्षणिक वर्ष **२०१९—२०** पासून लागू करण्यात येईल. तसेच ती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी, विद्यापीठ संकुल, विद्यापीठ उपकेंद्र, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथील **पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना** लागू राहील. तसेच भविष्यात विद्यापीठ परिक्षेत्रात अस्तित्वात येणाऱ्या उपकेंद्रातील व मॉडेल कॉलेजमधील विद्यार्थ्यांना लागू राहील.

१) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण हे संबंधित विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी उपयोगात आणता येतील व हे गुण एकापेक्षा जास्त विषयात उत्तीर्ण होण्यासाठी वापरले जातील.

२) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण हे अनुउत्तीर्ण विषयात (पेपरमध्ये) उत्तीर्ण होण्यासाठी व A.T.K.T. उत्तीर्ण होण्यासाठी देण्यात येतील.

३) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण हे लेखी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मौखिक व प्रकल्प लेखन (अंतर्गत परीक्षेसाठी) यात उपयोगात आणता येतील.

४) सदरील प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण हे परीक्षा विभागाकडून देण्यात येणाऱ्या समान अध्यादेशातील तरतुदीनुसार देण्यात येणाऱ्या लाभांश गुणांव्यतिरिक्त असतील.

५) विद्यार्थ्याने जर एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमेतर उपक्रमांमध्ये (विद्यार्थी विकास, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.), राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.), आविष्कार **(Avishakar)** सहभागी होऊन पारितोषिके प्राप्त केलेले असतील, तर संबंधित विद्यार्थ्यास सर्व उपक्रमांचे मिळून जास्तीत जास्त २५ गुण देय असतील.

६) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुणांचा लाभ हा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना लागू राहील. तसेच विद्यार्थी विकास विभाग, क्रीडा विभाग व आविष्कार अंतर्गत पारितोषिके प्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षात लाभ देण्यात येईल. प्रस्तुत अतिरिक्त गुण त्या–त्या शैक्षणिक वर्षातच देय असतील. पुढील शैक्षणिक वर्षात मागील शैक्षणिक वर्षाचे अतिरिक्त गुण कोणत्याही सबबीवर देय असणार नाहीत.

७) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)/राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) यामधील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुणांचा लाभ केवळ **पदवीच्या व पदव्युत्तर अंतिम** वार्षिक परीक्षेत देण्यात येईल.

८) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण हे विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी तसेच प्रथम व द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी गुण कमी पडत असतील तर देण्यात येतील.

९) एखाद्या विद्यार्थ्यास उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले अतिरिक्त गुण वापरून जर अतिरिक्त गुण शिल्लक राहत असतील, तर ते गुण त्याला प्राप्त झालेल्या एकूण गुणांत समाविष्ट करण्यात येतील.

१०) जर एखादा विद्यार्थी सर्व विषयात उत्तीर्ण असेल, तर त्याचे प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण हे त्याच्या गुणपत्रिकेमध्ये एकूण गुणांमध्ये समाविष्ट करण्यात यावेत व त्याच्या एकूण टक्केवारीमध्ये हे गुण ग्राह्य धरण्यात यावेत.

११) प्रस्तुत विद्यापीठाची अभ्यासक्रमनिहाय गुणवत्ता (Merit List) यादी तयार करताना अतिरिक्त गुणांचा समावेश करता येणार नाही.

## (I) विद्यार्थी विकास विभाग

१) प्रस्तुत विद्यापीठाकडून, मा. राज्यपाल कार्यालय उपक्रमांतर्गत व Association of Indian Universities यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या युवक महोत्सवात सांघिक किंवा वैयक्तिक स्पर्धेत पारितोषिक प्राप्त करणाऱ्या नियमित विद्यार्थ्यास प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देय असतील.

२) एकच विद्यार्थी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव, आंतर विद्यापीठीय इंद्रधनुष्य किंवा पश्चिम विभागीय, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सवात प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक प्राप्त केलेला असल्यास, या सर्व प्रकारच्या पारितोषिकांपैकी केवळ सर्वाधिक गुण देय असलेले पारितोषिक गुणदानासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

३) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देय असणाऱ्या युवक महोत्सवातील प्रमाणपत्राची सत्यप्रत परीक्षा सुरू होण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर प्राचार्यांमार्फत विद्यार्थी विकास विभागात दाखल करणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | युवक महोत्सव व पारितोषिक | प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण |
|---|---|---|
| १) | विद्यापीठीय पातळीवर युवक महोत्सवात प्रथम, द्वितीय किंवा तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास. | १० |
| २) | महाराष्ट्र राज्य मा. राज्यपाल कार्यालय उपक्रमांतर्गत आंतर विद्यापीठ (इंद्रधनुष्य) स्पर्धेत तसेच पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव स्पर्धेत प्रथम, द्वितीय किंवा तृतीय पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांस. | १५ |
| ३) | अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव व आंतरराष्ट्रीय दक्षिण आशियाई युवक महोत्सव स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांस. | २५ |

## (II) क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

१) प्रस्तुत विद्यापीठाकडून मा. राज्यपाल कार्यालय उपक्रमांतर्गत व Association of Indian Universities यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या स्पर्धेत सांघिक किंवा वैयक्तिक स्पर्धेत पारितोषिक प्राप्त करणाऱ्या नियमित विद्यार्थ्यास प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देय असतील.

२) एकच विद्यार्थी आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, क्रीडा महोत्सव, पश्चिम विभागीय व अखिल भारतीय विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ पारितोषिक प्राप्त केलेला असल्यास या सर्व प्रकारच्या पारितोषिकांपैकी केवळ सर्वाधिक गुण देय असलेले पारितोषिक गुणदानासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

३) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देय असणाऱ्या क्रीडा स्पर्धेतील प्रमाणपत्राची सत्यप्रत परीक्षा सुरू होण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर प्राचार्यांमार्फत क्रीडा विभागात दाखल करणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | क्रीडा स्पर्धा व पारितोषिक | प्रोत्सहनपर अतिरिक्त गुण |
|---|---|---|
| १) | विद्यापीठ पातळीवर, विभाग, सेंटर झोन किंवा आंतर विभागीय आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय आलेले वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारातील खेळाडू तसेच पश्चिम विभागीय/अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत व क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारातील खेळाडूस. | १० |
| २) | महाराष्ट्र राज्य मा. राज्यपाल कार्यालय उपक्रमांतर्गत आंतर विद्यापीठ (क्रीडा महोत्सव) स्पर्धेतील प्रथम, द्वितीय किंवा तृतीय क्रमांक आलेले सांघिक अथवा वैयक्तिक क्रीडा प्रकारातील खेळाडूस तसेच पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय किंवा चतुर्थ आलेल्या सांघिक अथवा वैयक्तिक क्रीडा प्रकारातील खेळाडूस. | १५ |
| ३) | अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय किंवा चतुर्थ आलेले सांघिक अथवा वैयक्तिक क्रीडा प्रकारातील खेळाडूस. | २५ |

## (III) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) विभाग

१) रा.से.यो. स्वयंसेवकांनी स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड अंतर्गत रा.से.यो. राबविणाऱ्या महाविद्यालयातून प्रत्येक वर्षात एकूण १२० तास या प्रमाणे सतत (सलग) २ वर्षात किमान २४० तास पूर्ण तसेच दोन वर्षांच्या कालावधीत एक ०७ दिवसाचे ग्रामीण भागातील निवासी शिबीर पूर्ण करणे आवश्यक आहे.

२) राष्ट्रीय सेवा योजना दोन वर्षाच्या कालावधीत अथवा पदवी अभ्यासक्रमांच्या कालावधीत त्याने रक्तदान केलेले असावे किंवा राज्यस्तरीय/राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सहभाग घेतलेला असावा. **मुलींसाठी रक्तदानाची अट राहणार नाही.**

३) विद्यार्थ्यास/स्वयंसेवकास प्रोत्सहनपर १० गुणांची अतिरिक्त गुणवाढ फक्त पदवीच्या अंतिम वर्षात देण्यात येईल.

४) सदरील प्रोत्साहनपर अतिरिक्त १० गुणांचा समावेश विद्यार्थ्यांना विषयात उत्तीर्ण होण्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल. विद्यार्थी एक किंवा अनेक विषयात अनुत्तीर्ण होत असेल तर त्या विषयात उत्तीर्ण होण्यासाठी अतिरिक्त गुणांचा लाभ देण्यात येईल.

५) विद्यार्थी सर्व विषयात उत्तीर्ण असेल तर त्यांना पदवी अंतिम वर्ष परीक्षेच्या गुणपत्रिकेत रा.से. यो. अंतर्गत प्रोत्साहनपर अतिरिक्त १० गुण एकूण गुणांत देण्यात येतील.

## (IV) राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.)

१) सलग दोन वर्षे राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) या उपक्रमात विद्यार्थी सहभागी असला पाहिजे.

२) दोन्ही वर्षातील त्यांची उपस्थिती किमान ७५ टक्के असावी.

३) दोन वर्षात किमान एक कॅम्प विद्यार्थ्यांनी पूर्ण केलेला असावा.

४) विद्यार्थी "बी" अथवा "सी" प्रमाणपत्र उत्तीर्ण असावा.

५) वरील राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) विभागातंर्गत चालणाऱ्या अनुक्रमे १ ते ४ उपक्रमात सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यास १० प्रोत्साहनपर अतिरिक्त गुणांची वाढ फक्त **पदवी/पदव्युत्तरच्या** अंतिम वर्षात देण्यात येईल.

## (V) आविष्कार

१) जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास अनुक्रमे ५ व ३ गुण देण्यात येतील.

२) आंतर महाविद्यालयीन, आविष्कार स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास अनुक्रमे अतिरिक्त १० व ५ गुण देण्यात येतील.

३) राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना अनुक्रमे २० व १५ अतिरिक्त गुण देण्यात यावेत.

४) विद्यार्थी ज्या शैक्षणिक वर्षात शिकत असेल त्याच वर्षात त्याला हे अतिरिक्त गुण देण्यात येतील.

### प्रस्ताव सादर करण्याचे नियम व अटी

१) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुणवाढ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक/संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण/विद्यार्थी विकास संचालक/आविष्कार समन्वयक यांनी प्रमाणित केल्यानंतर देण्यात येईल.

२) एन.सी.सी. चे अतिरिक्त प्रोत्साहनपर गुण देत असताना एन.सी.सी. चे प्रमाणपत्र पडताळणी मेजर/तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्याकडून करून घेण्यात यावी. ही कार्यवाही परीक्षा विभागामार्फत करण्यात यावी.

३) प्रोत्साहनपर अतिरिक्त गुणवाढीचे प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह संबंधित अभ्यासक्रमाची परीक्षा सुरू होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर महाविद्यालयाने संबंधित विभागात सादर करावा.

४) उशिरा प्रस्ताव दाखल करणाऱ्या महाविद्यालयास प्रती विद्यार्थी १०००/— (अक्षरी रुपये एक हजार) विलंब शुल्क भरूनच प्रस्ताव सादर करता येईल. संबंधित परीक्षेचा निकाल लागल्याच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही.

* * * * *

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY**
**Vishnupuri, Nanded – 431 606.**

# "Rules and Regulations Relating to Provide Additional Marks to the Under Graduation & Post Graduation Course Students Participating the Student Development , Sports & Physical Education , National Service Scheme, National Cadet Cors and Avishakar"

To nurture the overall growth of students and to make them society oriented, Hon. Chancellor's Office and University run many programmes. Hence, to motivate the students for this extra-curricular activity by giving additional marks to those students incentives them at its best. Therefore, the Committee after going through a number of regulations of the University, Other Universities of Maharashtra and Other State Government circulars has framed these regulations.

The present regulations will be effective from the Academic Year 2019-20. These Regulation swill be applicable to the student of the affiliated colleges, University School, University Sub-Centre, New Model Degree College, Hingoli and also to all educational institutes which will come into existence within the jurisdiction of this university.

For giving these additional marks for extra-curricular activity, the rules and regulations are as follows:

1. These additional marks will be applicable to the respective students by allowing them to get marks in more than one subject.
2. These additional marks will be applicable for those students who failed or got an ATKT in the respective subjects.
3. These additional marks are to be included in written, practical, internal, and project-writing (internal examination).
4. These mentioned additional marks will be based according to the respective Ordinances for the respective above mentioned benefits.

5. If a student has participated in more than one activity and won in the extra-curricular programmes (Student Development, Sports, N.S.S., N.C.C., Avishkar), he/she will get maximum 25 marks.
6. The said prerogative will be applied to graduate and post-graduate students. Students participating in Student Development Board, Sports Department and Winners of Avishakar Prize will get additional marks each year. These additional marks, on condition must not carry forward in the next or succeeding Academic Year.
7. The N.C.C. and N.S.S. students shall get the benefit of the additional marks only in the final year of their PG/UG programme.
8. These additional marks are to be given as an incentive for the students who are in need to pass examination and to secure their First Class and Second Class only.
9. The additional marks, which surpass the passing marks limit, will be added in the total marks.
10. If a student has cleared all the subjects then these additional marks are to be adjusted with the gross total so that he/she will get an increased percentage.
11. While making the subject-wise Merit List of University, the respective

**I) Student Development Department**

1. Many programmes are run by the Hon. Chancellor's Office in the University which are sponsored by Association of Indian Universities. These additional marks shall be given to those students who attain rank in individual or group event in various types of youth festivals.
2. A student who participates in more than one activity at Inter Collegiate Youth Festival, Inter University Level "Indradhanushya" or West Zone, All India Inter University Youth Festival and secure First, Second and Third place in all of them, the highest marks should be accepted.

3. It is mandatory to submit photocopies of the Certificates in the Office of Student Development Board through Principal 15 days prior to the commencement of examination.

| Sr. No. | Youth Festival & Prizes | Marks |
|---|---|---|
| 1. | Students attaining the First, Second or Third Prize at University Level. | 10 |
| 2. | Students attaining the First, Second or Third Prize under activities under Hon. Chancellor's Office, Inter University (Indradhanushya) Youth Festival as well as West Zone Inter-University Youth Festival Tournament. | 15 |
| 3. | Students attaining the First, Second, Third or Fourth Prize in the All India Inter University National Youth Festival and in the International South Asian Youth Festival. | 25 |

**II) Sports Department**

1. Many programmes are run by the Hon. Chancellor's Office in the University which are sponsored by the Association of Indian Universities. These additional marks shall be given to those students who wins a prize in individual or team event.

2. A student who participates in more than one activity at Inter Collegiate Tournament, Krida Mahotsav, West Zonal and All India Inter University Tournament and secure First, Second, Third and Fourth Rank in all of them, a highest score should be considered for giving marks.

3. It is mandatory to submit photocopies of the certificates in the Office of Director Sports & Physical Education through Principal prior to 15 days of the commencement of examination.

| Sr. No. | Sport Tournament & Prizes | Marks |
|---|---|---|
| 1. | In all of the activities, students attaining individual or Team Event the First, Second or Third Prize at Zone, Centre Zone and Inter Zone Inter Collegiate Tournament and the students participating in All India/West Zone Inter University and 'Krida Mahotsav' Tournaments. | 10 |
| 2. | Students attaining individual or team event the First, Second or Third Prize under activities of Hon. Chancellor's Office (Krida Mahotsav), Inter University Sports Tournament as well as students attaining in individual or Team Event the First, Second, Third or Fourth Prize in West Zone Inter University Tournament. | 15 |
| 3. | Students attaining the First, Second, Third or Fourth Prize in the All India Inter University Tournament. | 25 |

**III) N.S.S. (National Service Scheme)**

1. A candidate who is enrolled in N.S.S. under S.R.T.M. University, Nanded has to complete 120 hours of National Service Scheme for one year and 240 hours for two years consecutively and should complete the seven-day Residential N.S.S. Camp in rural area.
2. In two years of N.S.S. period, or period of Graduation course candidate must have donated blood or participated in State Level/National Level N.S.S. Camp. **Blood Donation is exempted for Female.**
3. Additional 10 marks will be applicable to only the student of final year of Under Graduation Course.

4. This additional marks will be assumed if candidate failed in one or two subjects. Those additional marks will be applicable to the respective students by allowing them to get marks in more than one subject.
5. If candidate passes in all subjects, the additional 10 marks will be added in his total marks and the marks may be added under title of Additional Marks under N.S.S. Activity in the final year Marks Sheet.

**IV) N.C.C. (National Cadet Corps)**

1. A Cadet should participate in N.C.C. activity for continuously two years.
2. A Cadet's attendance must be 75% in two years.
3. A Cadet should complete at least one N.C.C. Camp in two years.
4. A Cadet should get "B" or "C" Certificate of N.C.C.
5. A Cadet who fulfils the abovementioned 1 to 4 conditions will get additional 10 marks for final year of Under Graduation & Post Graduation Course.

**V) AVISHKAR**

1. A candidate who obtains 1st and 2nd rank in District Level 'Avishkar' will get 5 and 3 additional marks respectively.
2. A candidate who obtains 1st and 2nd rank in Intercollegiate 'Avishkar' will get 10 and 5 additional marks respectively.
3. A candidate who obtains 1st and 2nd rank in State Level 'Avishkar' will get 20 and 15 additional marks respectively.
4. Additional marks will be applicable in that Academic Year only.

**Rules and Regulations for Submitting the Proposal**

1. Additional marks will be given after the verification by N.S.S. Co-ordinator /Director, Sports & Physical Education/Director of Student Development and Avishkar Co-ordinator.

2. Additional marks of N.C.C. will be given after the verification by Major/ Equivalent Grade Officer. The Exam Department will do this process.
3. Proposal for Additional marks should be submitted by college with required authentic documents before the 15 days of exam.
4. Submission of proposal by college after the deadline will be charged Rs.1,000 (Rupees One Thousand only) per student. In any case, the proposal of additional marks will not be acceptable after 30 days of results declaration.

* * * * *

विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत येणा—या उपक्रमामध्ये पारितोषिक प्राप्त पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्यासाठी तपशील तक्ता.

महाविद्यालयांचे नाव : ——————————————— परिक्षा (मार्च/एप्रील) : —————

शाखा : ———————————————— शैक्षणिक वर्ष : —————

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | बैठक क्रमांक | विद्यापीठ युवक महोत्सव /इंद्रधनुष्य /पश्चिम विभागीय /आखिल भारतीय युवक महोत्सव/दक्षिण आशियाई युवक महोत्सव | कलाप्रकार | पारितोषिक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रथम | द्वितीय | तृतीय | चतुर्थ |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |

सांस्कृतिक प्रमुख स्वाक्षरी व नाव मा. प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का